खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर

ता. खेड, जि. पुणे

## द्वितीय  वर्ष कला (SYBA)

## मराठी (जी - २)

## सत्र चोथे

## मराठी साहित्य : भाषिक कौशल्यविकास आणि आधुनिक मराठी

## साहित्यप्रकार : ललितगद्य (CC-1 D(3)A)

## घटक २) 'साहित्यरंग' पाठ्यपुस्तक

## लेख ४) शब्दभ्रम, अर्थभ्रम : द. भि. कुलकर्णी

डॉ. संजय शिंदे
उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर

ई - मेल : dr.sdshinde80@gmail.com    भ्रमणध्वनी क्र. : 9604309060

SANJAY MAR HRM

## ‘साहित्यारंग’ पाठ्यपुस्तक

# लेख ४) शब्दभ्रम, अर्थभ्रम : द. भि. कुलकर्णी

### लेखक परिचय

**आधुनिक मराठी साहित्यातील महत्त्वाचे समीक्षक.** 'मेघ', 'मोर आणि मैथिली', 'जुने दिवे, नवे दिवे', 'महाकाव्य : स्वरूप आणि समीक्षा', 'मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र' इत्यादी अनेक ग्रंथांचे लेखन त्यांनी केलेले आहे. पुणे येथे २०१० साली झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते.

**'शब्दभ्रम, अर्थभ्रम' हा द. भि. कुलकर्णी यांचा लेख आहे. हा लेख शब्दांविषयींची सजगता अधोरेखित करतो. अक्षरभ्रमामुळे शब्द आणि अर्थाची कशी हानी होऊ शकते, हे त्यांनी या लेखाच्या माध्यमातून सांगितले आहे.**

### लेखाचा आशय :

द. भि.कुलकर्णी विद्यार्थ्यांना सुचवितात, की तुमचे अक्षर **वाच्च** असावे. लेखनिकांनीही **मुद्रकांसाठी लिहितो** आहोत, याचे भान ठेवावे. **कुठेही अक्षरभ्रम होणार नाही;** याची काळजी घ्यावी. त्यासाठी प्रकाशन संस्थांनी **'मराठी मार्गदर्शन अधिकारी'** नेमायला हवेत.

साहित्यव्यवहारात शब्दभ्रम आणि अर्थभ्रम होऊ नये यासाठी लेखक द. भि. कुलकर्णी काही गोष्टी सुचवितात. संपादक प्रकाशकांनी **'काव्यसंग्रह' शब्दप्रयोगऐवजी 'कवितासंग्रह'** म्हणावे. **एडिशन म्हणजे आवृत्ती.** मराठीत एखाद्या पुस्तकाच्या अनेक आवृत्त्या निघतात असे आपण म्हणतो. पण त्या **आवृत्त्या नसून पुनर्मुद्रणे** असतात. **'आवृत्ती' मध्ये बदल, संक्षेप, विस्तार असे काहीतरी अभिप्रेत असते. त्याचप्रमाणे 'किंमत' म्हणजे 'प्राईस' आणि 'मूल्य' म्हणजे 'व्हॅल्यू'. 'प्राईस' आणि 'व्हॅल्यू' या शब्दांतील अर्थबदल जाणकार वाचकांनी लक्षात घ्यायला हवेत.**

SANJAY MARHRM

**वाद आणि विवाद्य** या शब्दांच्या अर्थाबाबतही घोटाळा होतो. तसेच **लेखकद्वयाने किंवा लेखकद्वयांनी** अशी चुकीची शब्दरचना केली जाते. **भौतिक आणि आधिभौतिक** असे विरुद्धार्थी शब्दही चुकीच्या पद्धतीने वापरले जातात.

**वरील चुकांची दुरुस्ती व्हावी यासाठी भाषा वापरताना शब्द आणि वाक्य यांचा अर्थ, त्यातील सूक्ष्म विराम - आघात - कंप - क्रम हे सारे अचूकपणे लिहायला हवे.** कारण सिंह, संसार, फार, फुल इत्यादी शब्दांचे चुकीचे उच्चार अलीकडे खूप रूढ झाले आहेत. त्यामुळे बरोबर उच्चार कोणता हेच अनेकांना कळत नाही.

या पार्श्वभूमीवर **शब्दकोश आणि व्याकरणाचे नियम पाठ करून हा प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी आपली भाषिक संवेदनशीलताच वृद्धिंगत करावी लागेल.** केवळ मातृभाषेत नव्हे एकूण भाषासंस्थाच पवित्र, मूल्यवान आहे हे स्वतःला पटवून द्यावे लागेल. कारण भाषाशक्तीने आपण इतर व्यवहारातील बधीरपणा दूर करू शकतो.

**भाषा जितकी जाणकारीने आपण वापरू तितकी तिची अभिव्यक्तीची, संप्रेषणाची, साठवणीची, नवनिर्मितीची शक्ती वाढत जात असते.** आपण आणि प्रतिभावंत साहित्यिकही भाषा समाजापासून एकमार्गी उसनी घेत नसतो; तर तिला अधिक शक्तिमान करून ती सव्याज समाजाला परत करीत असतो. आज मात्र तसे होताना दिसत नाही. हुळहुळते लोकप्रिय शब्द किंवा लोकबोली यांच्या अनुकरणातून साहित्यकृती विकसित होत नाही तर त्यातून अर्थभ्रम मात्र निर्माण होतात. अक्षरभ्रम परवडले; ते दूर करता येतात; अर्थभ्रम मात्र समाजात चरत जातात. अर्थभ्रम हा भाषिक रोग नाही; रोगप्रतिकारकक्षमता नष्ट करणारी ती एक भाषिक अवस्था आहे, असे लेखक सांगतात.

**अशाप्रकारे 'शब्दभ्रम, अर्थभ्रम' या लेखातून द. भि. कुलकर्णी शब्दांविषयाची सजगता अधोरेखित करतात. अक्षरभ्रमामुळे शब्द आणि अर्थाची हानी होऊ शकते. अर्थभ्रम हा भाषिक रोग नाही, तर ती रोगप्रतिकारक्षमता नष्ट करणारी एक भाषिक व्यवस्था आहे.... भाषाशक्तीने व्यवहारातील बधिरपणा दूर होऊ शकतो.... भाषा ही तंतुवाद्यासारखी असते.... भाषिक संवेदनशीलता वृद्धिंगत होणे गरजेचे आहे.... भाषेचा जाणकारीने वापर केला तर तिची अभिव्यक्ती, संप्रेषण, साठवण आणि नवनिर्मितीची शक्ती वाढते.**



SANJAY MAR HIRM

**अल्पाक्षरत्व आणि आशयाच्या समृद्धतेमध्ये या लेखाचे सौंदर्य दडलेले आहे. शब्दार्थाचे महत्त्व स्पष्ट करणारा हा लेख आहे..**

---------------------------------------------------------------------------------------------------

**अध्यापन साहित्य निर्मिती :**
**डॉ. संजय शिंदे ,**
**हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर**

**संदर्भ ग्रंथ :**

१) **साहित्यरंग : डॉ. शिरीष लांडगे व इतर (संपादक)**

SANJAY MAR HRM